# लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती


# मेट्रो, सागरी किनारी मार्ग प्रकल्पांची सद्यःस्थिती काय?

## अश्विनी भिडे यांच्याकडून जाणून घेण्याची संधी; 'लोकसत्ता शहरभान'चे सत्र उद्या

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई सागरी किनारा प्रकल्प अर्थात कोस्टल रोड या मुंबई महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे ८१ टक्के काम पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प साकारण्यात मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांचा मोठा वाटा आहे. 'मेट्रोवुमन' अशी ओळख असलेल्या भिडे यांच्याच नेतृत्वाखाली मुंबईतील सर्व मेट्रो मार्गिकांची कामे सुरू आहेत. या प्रकल्पांची सद्यःस्थिती काय, त्याचा काय लाभ होणार, आव्हाने काय, यांसह इतरही अनेक मुद्द्यांची उत्तरे भिडे यांच्याकडूनच जाणून घेण्याची संधी 'लोकसत्ता शहरभान'च्या येत्या सत्रात मिळणार आहे. पवईतील आयआयटी मुख्य प्रवेशद्वाराजवळील पवई बँक्वेट हॉल येथे बुधवारी, ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.१५ वाजता भिडे यांच्याशी संवाद साधता येणार आहे.

मुंबईच्या पायाभूत विकासातील महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे मेट्रो. हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प ज्यांच्या प्रशासकीय अखत्यारीत आकारास येत आहेत, त्या अश्विनी भिडे यांच्याकडूनच प्रकल्पाचे तपशील, बारकावे, प्रश्न यांची उत्तरे 'लोकसत्ता शहरभान'च्या माध्यमातून मिळणार आहेत. त्या एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका आणि पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. शहरातील यंत्रणा कशा चालतात, प्रकल्प कसे आकारास येतात, अशा अनेक मुद्द्यांचे भान वाढवणाऱ्या या उपक्रमात सर्वांना सहभागी होता येईल.




**मुख्य प्रायोजक**
- सारस्वत को-ऑप. बँक लि.

**सहप्रायोजक**
- वीणा वर्ल्ड
- हिरानंदानी ग्रुप



| काय? | कधी ? | कुठे? |
|---|---|---|
| लोकसत्ता शहरभान | ८ नोव्हेंबर, सायंकाळी ६.१५ वाजता | पवई बँक्वेट हॉल, आयआयटी मुख्य प्रवेशद्वारासमोर, पवई. |

### प्रवेश नोंदणीसाठी संपर्क

'लोकसत्ता शहरभान' हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. मात्र कार्यक्रमाला मिळणारा मुंबईकरांचा प्रतिसाद पाहता दूरध्वनीद्वारे पूर्वनोंदणी करणाऱ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याकरिता आज, बुधवारी सकाळी १० ते सायंकाळी सहा या वेळेत ०२२-६७४४०२२२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करावी.


**रोझारी बायोटेक लिमिटेड**

ROSSARI making you more competitive

**नोंदणीकृत कार्यालय :** २०१ए-बी, २रा मजला, आकृती कॉर्पोरेट पार्क एल. बी. एस. मार्ग, जीई गार्डनच्या पुढे, कांजुरमार्ग (प), मुंबई – ४०००७८.

CIN:L24100MH2009PLC194818

**दुरध्वनी:** +९१ २२ ६१२३ ३८०० ● **संकेत स्थळ :** www.rossari.com

**ई-मेल :** info@rossari.com

**पोस्टल बॅलटची सूचना आणि दूरस्थ ई-मतदान माहिती**

याद्वारे सदस्यांना सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ च्या ('कायदा") कलम १०८ आणि कलम ११० आणि इतर, लागू असल्यास त्या तरतुदी, सोबत वाचीत कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ चे नियम २० आणि २२ सुधारणा केल्याप्रमाणे, सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑबलीगेशन अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिकवायरमेंट )विनियम २०१५ च्या विनियम ४४ ('नोंदणी विनियम") सोबत वाचीत सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/ २०२०, दिनांक ०८ एप्रिल २०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र. १७/ २०२०, दिनांक १३ एप्रिल २०२०, सर्वसाधारण